जगभर

तुर्कस्तान - कुर्द - सीरिया

पुरन्दरे चन्द्रशेखर

गेली आठ-नऊ वर्षे चालू असलेल्या सीरियातील हत्याकांडात संयुक्त राष्ट्रसंघाच्या अंदाजानुसार २०१७ पर्यंत चार लाख मृत्यू पावले. या कत्तलीला अनेक पदर आहेत. हुकूमशाही विरुद्ध लोकशाही, शिया मुस्लिम विरुद्ध सुन्नी मुस्लिम, राष्ट्रवाद, असहिष्णुता, अमेरिका-रशिया चुरस, इत्यादी.

प्रथम लेखाच्या दृष्टीने महत्त्वाचा वांशिक पदर पाहू. तो म्हणजे सीरियातील कुर्द वंशाचे लोक. ते सीरियाखेरीज तुर्कस्तान, इराण, इराक या देशात विखुरलेले आहेत. प्रत्येक ठिकाणी अल्पसंख्यांक. त्यामुळे मुख्य प्रवाहाच्या सामाजिक आणि राजकीय दडपशाहीचे बळी. ही परिस्थिती दुसऱ्या महायुद्धाच्या काळापासून चालू आहे. तेव्हा त्यांचे राष्ट्र स्थापण्याचे आश्वासन तेथे तोपर्यंत वसाहत असणाऱ्या विजयी पश्चिमेने दिले होते. ते पाळले नाही आणि हे लोक अधांतरी राहिले. स्वत:चे राष्ट्र नसणारा व राष्ट्र हवे असणारा हा जगातील सगळ्यात मोठा वांशिक समूह. त्यांना त्यांच्या लोकवस्तीच्या वरील चार देशांमधील संलग्न भूभाग स्वत:चे राष्ट्र म्हणून गेले शतकभर हवा आहे. [काहीसा भारतातील काश्मिरी, मणिपुरी, नागा किंवा चीनमधील वीघर मुस्लिमांचा प्रश्न.] त्याला कोणत्याच देशाची तयारी नाही. कुर्द सीरिया-इराकमधील बहुसंख्यांकांसारखे अरब नाहीत, इराणमधील बहुसंख्यांकांसारखे पर्शियन नाहीत किंवा तुर्कही नाहीत. त्यांच्यातील बहुसंख्य मुस्लिम असले तरी त्यांच्या श्रद्धा निराळ्या आहेत. म्हणजे मूलत: हा प्रश्न वांशिक अस्मितेचा व नंतर स्वायत्ततेचा आहे. सीरियातील अलिकडच्या अराजकाचा कुर्द लोकांना फायदा झाला. असदचे केंद्र सरकार दुबळे झाल्याने त्यांनी सीरियाच्या उत्तर प्रदेशात स्वत:चे अर्ध-स्वायत्त राज्य निर्माण करायला सुरुवात केली.

[या प्रश्नांची नोंद सप्टेंबर २०१५, एप्रिल २०१६, नोव्हेंबर २०१७, एप्रिल २०१८ 'आंदोलन'मध्ये घेतली आहे.]

अन्य महत्त्वाचे घटक पहाता २०११ च्या अरब वसंताच्या काळात सीरियातही हुकूमशहा बसर असद याच्याविरुद्ध लोकशाही मार्गाने शांततापूर्ण निदर्शने सुरू झाली. सत्ता जाईल या भीतीने हा विरोध करणाऱ्या लोकांना 'आतंकवादी' संबोधून असदने त्यांना दडपले. काही जण त्यामुळे सशस्त्र विरोधाकडे वळले. आपल्याकडच्या नक्षलवाद्यां-सारखे. तेव्हा अमेरिकेने असदविरुद्ध लढण्यासाठी 'लोकशाहीच्या पुरस्कारा'साठी आम्ही शस्त्रे देऊ असे आश्वासन दिले. [जणू काही अमेरिका या उदात्त ध्येयाची पाठीराखी !] ते पाळले नाही आणि हा गट [Free Syrian Army] २०१७ ला असदच्या सैन्यापुढे आणि कर्मठ धर्ममार्तंडांच्या आक्रमणा-पुढे निष्प्रभ झाला. दुसरा पदर धार्मिक. असद व त्याची राजवट शिया मुस्लिम आहे. त्यामुळे मध्य पूर्वेतील एकमेव समर्थ शिया राजवटीने - इराणने - असदला पाठिंबा दिला. असदविरोधी गटांचा पाडाव करण्यासाठी इराणने त्याला सशस्त्र मदत केली, आपले लष्करी सल्लागारही सीरियाला पाठवले. तिसरा पदर इस्लामिक स्टेटचे पुरस्कर्ते. हे अतिशय हिंसक, सुन्नी माथेफिरू. त्यांना मान्य नसणाऱ्या इतर श्रद्धा असणाऱ्या लोकांना जगण्याचा हक्क नाही हा त्यांचा आदर्शवाद. त्यांचा एककलमी कार्यक्रम म्हणजे मध्यपूर्वेत हजार वर्षांपूर्वीची कडवी, स्त्रीद्वेष्टी, प्रतिगामी, हिंसाधिष्ठित इस्लामी खिलाफत स्थापन करणे. ते असदच्या विरुद्ध असण्याची दोन कारणे - एक ती शिया राजवट होती, दोन - हुकूमशाही असली तरी सहिष्णु होती.

या पार्श्वभूमीनंतर वर्तमानाकडे वळू.

९ ऑक्टोबरला तुर्कस्तानने उत्तर सीरियातील कुर्द-बहुल प्रदेशावर लष्करी कारवाई सुरू केली. आजमितीला तुर्कस्तानमध्ये ४० लाख सीरियन निर्वासित आहेत. अशांततेच्या आधीच्या सीरियन लोकसंख्येच्या १५ टक्के. तुर्कस्तानचा सर्वेसर्वा एर्दोगन. त्याच्या मते सीरिया-तुर्कस्तानमधील सीरियाच्या हद्दीतील प्रदेश हा आतंकवाद्यांचा प्रदेश आहे. ते तुर्कस्तानमध्ये अशांतता निर्माण करतात. त्यासाठी त्यांना तेथून हुसकावून लावणे आवश्यक आहे. तुर्कस्तानला सीमेवरचा तीस किलोमीटर रुंदीचा पट्टा 'सुरक्षित पट्टा' करायचा आहे. तो सीरियात

असेल. तेथे तुर्कस्तानला आलेले सीरियन निर्वासित पुनर्वसित करण्यात येतील. आज हा प्रदेश कुर्द-बहुल आहे. इस्लामिक स्टेट विरुद्धच्या कारवाईत त्यांनी अमेरिकेची साथ दिली. ते युद्ध संपुष्टात आलेले नाही पण स्टेटचा बऱ्यापैकी पाडाव झाला. त्यात कुर्द सहभाग अतिशय महत्त्वाचा होता. त्यांनी वेळोवेळी पुरवलेल्या स्थानिक माहितीखेरीज ही कारवाई पुढे सरकली नसती.

पण ट्रम्प महाशयांनी ६ ऑक्टोबरला अमेरिकन लष्करी मुक्काम सीरियातून हलवण्याचा निर्णय अचानक जाहीर केला. दुसऱ्या शब्दात तुर्कस्तानच्या चढाईकडे अमेरिका दुर्लक्ष करेल असा संकेत तुर्कस्तानला मिळाला. आणि तुर्कस्तानने प्रथम बॉम्बिंग केले. मग लष्कर सीरियात घुसवले. कारण कुर्द लोकांना व लष्कराला असणारा अमेरिकन पाठिंबा अचानक नाहीसा झाला. एर्दोगन पहिल्यापासून कुर्द-द्वेष्टा आहे. 'सुरक्षित पट्टा', निर्वासितांचे पुनर्वसन या घोषित उद्देशांबरोबर कुर्द लोकांचे अर्ध-स्वायत्त राज्य नष्ट करणे, त्यांना नेस्तनाबूत करणे हा उद्देश आहे. कारण सीरियन कुर्द आणि तुर्की कुर्द यांचे संगनमत आहे. तुर्की कुर्दांची स्वायत्ततेची मागणी ही आपल्या काश्मीरसारखी केंद्रीय तुर्क सरकारला कायमची बोच आहे.

पण हा प्रकल्प एर्दोगनला दिसतो आणि तो जगाला दाखवतो तेवढा सोपा नाही. तो तुर्कस्तानला काही काळातच बराच महाग जाईल. एकतर, ज्यांचे पुनर्वसन करायचे ते तुर्कस्तानमधील निर्वासित बहुसंख्य अरब आहेत. त्यांना कुर्द-बहुल प्रदेशात सक्तीने वसवणे भूमिपुत्र कुर्द लोकांना मान्य होणार नाही आणि निर्वासित अरबांनाही. त्यातून नवे संघर्ष उद्‌भवणार. मग अरबांचा बराच ओघ इराककडे वळू शकतो. म्हणजे नवी अस्थिरता. इराकला त्यांचे प्रश्न पुरेसे आहेतच, त्यात ही भर पडणार. निर्वासितांसाठी अल्पावधीत हे दुसरे विस्थापन. आणखी एक पैलू म्हणजे कुर्द लोकांच्या ताब्यात स्टेटचे 'योद्धे' आहेत. ते काही हजारात असतील. तुर्कस्तानने आक्रमण करताच निर्माण झालेल्या गोंधळाचा फायदा घेऊन यातील काही-शे आताच तुरुंगातून पळाले आहेत. त्यांचा जीवघेणा उपद्रव तुर्कस्तानात, सीरियात सुरु होणार. कुर्द लोकांचे प्राधान्य आता स्वत:चा प्रदेश तुर्की आक्रमणापासून शाबूत राखणे हा आहे. स्टेटच्या माथेफिरूंशी लढणे हे नाही. अमेरिका बरोबर असतानाची परिस्थिती रातोरात बदलली आहे. याचा मोठा फायदा स्टेटला होणार आणि आणखी हिंसाचार सुरू होणार. या साऱ्या संभाव्य परिणामांचा विचार करण्याची ट्रम्पला कुवत नाही. त्यामुळे ज्यांचा या गुंतागुंतीचा अभ्यास आहे ते त्याच्याच राजवटीतील परकीय धोरणतज्ञ एक विधान करत आहेत तर ट्रम्प बरोबर विरुद्ध धोरण जाहीर करत आहे हे चित्र आहे. ट्रम्पला त्याच्या मतदारांची नस परराष्ट्रीय तज्ञांपेक्षा अधिक अचूक माहीत आहे. इतर देशांच्या अंतर्गत संघर्षात अमेरिका का पडते हा त्याच्या समर्थकांचा प्रश्न. त्या देशांना त्यांचे गोंधळ निस्तरू दे. पण मुळात प्रश्न निर्माण करण्यात अमेरिकाही अंशत: तरी जिम्मेदार होती याचा या लोकांना विसर पडतो. ही लोकशाहीची मर्यादा.

तुर्कस्तानला विरोध करायला लष्करी दृष्ट्या आपण असमर्थ आहोत याची कुर्द लोकांना त्वरित जाणीव झाली आणि त्यांनी बशर असदकडे मदत मागितली. जागतिक पटलावर कालचे शत्रू आज लगेच कसे साथीदार होतात याचे हे उदाहरण. सीरियावरच्या कोणत्याही आक्रमणाला सीरियन सैन्य विरोध करेल असे म्हणत असदनेही सैन्य मुक्रर केले. म्हणजे यात तुर्कस्तान विरुद्ध सीरिया हा संघर्ष उभा रहात आहे. कुर्द लोकांचा अर्ध-स्वायत्त प्रदेश असदला नामंजूर आहेच. त्यांचा प्रदेश हा सीरियाच्या भाग आहे म्हणून त्याचे रक्षण करण्याचा मोबदला म्हणून ती स्वायत्तता तो त्यांना सोडायला लावेल.

वरती Free Syrian Army चा उल्लेख केला आहे. या गटाला अमेरिकेने धोका दिला होता. आता असदच्या विरोधात तुर्कस्तानचा उपयोग होईल असे त्यांना वाटते म्हणून ते तुर्की आक्रमणाचे स्वागत करत आहेत. याच्याशी संलग्न बाब म्हणजे, या Army ची असदविरोधी ताकद वाढल्यास असदचे समर्थक रशिया आणि इराण अधिक हस्तक्षेप करतील. मग war of all against all ही परिस्थिती आज आहेच, ती आणखी तीव्र होईल.

एर्दोगनला त्याच्या तुर्क नागरिकांचा या कारवाईला पाठिंबा आहे. फुटीरतावादी समूह कोणत्याच मुख्य प्रवाहाला मान्य नसतात. त्यात एर्दोगनला आपण नव्या तुर्कस्तानचे भाग्यविधाता आहोत असा गंड आहे. आधुनिक तुर्कस्तानचा निर्माता कमाल अतातुर्क. त्याने या निधर्मी राष्ट्राचा पाया घातला व तुर्कस्तान मुस्लिम परंपरेपासून म्हणजे मध्य-पूर्वेकडून पश्चिमेकडे वळवला. एर्दोगनला ते मंजूर नाही. त्याला तुर्कस्तानला

(पान ३६ वर)

Marathi-Monthly - Andolan Shashwat Vikasasathi, Editor-Medha Patkar. Postal Regn. No. MCE/296/2018-20
RNI No. MAHMAR/2009/30128 Licence to Post without Prepayment No. MR/Tech WPP/East/358/2019
Date of Publication 1st of every month Date of Posting 1st of every month Posted at Dadar P.O. 400014.

(जगभर... पान १७ वरून)

परत एक मुस्लिम संस्कृती[च]असणारा देश करायचा आहे. [अशा धोरणाचे प्रतिबिंब आपण आपल्याकडे आज पहात आहोत] अतातुर्कच्या आधीचे तुर्कस्तानचे ओटोमान साम्राज्य मध्य-पूर्वेच्या मोठ्या प्रदेशावर होते. एर्दोगनची महत्त्वाकांक्षा ते साम्राज्य परत उघड नाही तरी सुप्त रूपाने प्रस्थापित करण्याची आहे. असा हा दुहेरी गंड आहे.

एकूण चित्र पहाता पुढील वैरे वाढणार असे दिसते- तुर्कस्तान-सीरिया; या दोन्हीअंतर्गत - कुर्द विरुद्ध केंद्र सरकार; इस्लामिक स्टेट विरुद्ध कुर्द; इस्लामिक स्टेट विरुद्ध सीरियन सरकार; Free Syrian Army विरुद्ध असद; इराण-रशिया यांच्या मदतीने असद या सर्वांविरुद्ध. वैयक्तिक अनभ्यस्त लहरीपणाचे ट्रम्प हे उदाहरण. असा माणूस अमेरिकेसारख्या शक्तिशाली देशाच्या सर्वोच्च स्थानी आहे. तर एर्दोगनसारखा स्थानिक हुकूमशहा असदसारख्या दुसऱ्या स्थानिक हुकूम-शहाच्या विरोधात आहे. वैयक्तिक सत्ता एवढेच त्यांचे गमक. रक्तपिपासा हा एकमेव कार्यक्रम असणारे स्टेट या गदारोळात या क्षेत्रातील आपला प्रभाव वाढवणार ही शक्यता आहेच. त्यात लक्षात घेण्यासारखी गोष्ट म्हणजे अमेरिका, तुर्कस्तान या लोकशाही आहेत. लोकशाही मानवी उदात्तीकरणा-कडे नेत नाही असे दिसते. कारण आपले वैध विरोधक मूलतत्त्ववादी, आतंकवादी आहेत हा राज्यकर्त्यांचा दावा जनतेला मान्य होतो.

दरम्यान लाखात निष्पाप नागरिक असहायपणे विस्थापित होणार, शेकड्यात बळी जाणार. त्यांची पुढची पिढी ही जागतिक शांततेसाठी गंभीर समस्या आहे. तिची सार्वजनिक किंवा संस्थात्मक दखलही दिसत नाही, उपाययोजना दूरच. या जागतिक बेजबाबदारीची किंमत आजवरच्या मानवी इतिहासानुसार समाजाचा सगळ्यात खालचा थर मोजणार.

art-non-deco.com
artnondeco@yahoo.co.uk

(आस्वाद... पान २९ वरून)

कधीकधी आपलं वर्तन असतं. ते आपल्याला कळतही असतं. आणि मग समोरची व्यक्ती त्याला प्रश्न करायला लागली की ते सहन होत नाही. त्या व्यक्तीचा अप्रोचच सहन होत नाही. स्वत:ची वाट लागते आणि मग आपल्या वागण्याला पोकळ स्पष्टीकरणं दिली जातात, जसा हा नायक देतोय. तसाच आहे तो," आदिश सांगतो. आणि खरंच आहे. तुम्ही थिएरॉटिकली कितीही बरोबर असलात तरी मनाचा पहारा नसेल तर तुमचं वागणं सुसंगत राहात नाही.

रोहित काकडे आणि खुशबू उपाध्याय यांनी चित्रपटातल्या 'तो' आणि 'ती' या दोन व्यक्तिरेखा पेलण्याचं आव्हान यशस्वीपणे स्वीकारलं आहे. त्या व्यक्तिरेखांचा अटिट्यूड त्यांनी नेमका वागण्या-बोलण्यात आणि चेहऱ्यावरही आणला आहे. या चित्रपटाचा अटिट्यूडही आपण आजुबाजूला पाहात असलेलं आयुष्य समोर आणतो; तथाकथित चित्रपटाच्या चौकटीबाहेरचं. ते अधिक उघडपणे दिसलं की आपण चमकतो. बिथरतो. पण चित्रपट पुढे सरकताना हे असंच असणार आहे याची आपल्याला जाणीव होते आणि 'वेगळेपणा'कडेही आपण एका वेगळ्या दृष्टीने पाहायला लागतो!

vaishali.rode@gmail.com

To,

'शाश्वत विकास न्यास'च्या मालकीचा 'आंदोलन - शाश्वत विकासासाठी'चा हा अंक संपादक, मुद्रक, प्रकाशक मेधा पाटकर यांनी 'श्री गुरुकृपा प्रिंटर्स' १२१, अलाइड इंडस्ट्रियल इस्टेट, राम पंजवानी मार्ग, माहिम, मुंबई ४०००१६ येथे छापून दादर, मुंबई येथून प्रकाशित केला.
प्रेषक : २९-३०, पहिला मजला, 'ए' विंग, हाजी हबीब बिल्डींग, नायगाव क्रॉस रोड, दादर (पूर्व), मुंबई ४०००१४.